# 'त्या' विद्यार्थ्यांच्या परीक्षा १७ पासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षातील शेवटच्या सत्राच्या परीक्षांना गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा १७ ते १८ डिसेंबर दरम्यान घेण्यात येणार आहे. या परीक्षा केवळ ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालाक गजानन पळसे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीमध्ये घेण्यात आल्या. ४८ हजार २५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर २४ हजार ४७५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. मात्र या परीक्षेला कोरोना, तांत्रिक कारण तसेच राज्य सामाईक प्रवेश प्रक्रिया



यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सुमारे ३ हजार विद्यार्थी गैरहजर राहिले होते. या विद्यार्थ्यांची परीक्षा परत घेण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली होती. यानुसार या परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. शुक्रवार (१७) व शनिवार (१८) डिसेंबर दोन दिवस परीक्षा चालणार आहेत.

दोन दिवसांत चार सत्रांमध्ये परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाच्या वतीने

- विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे करावी लागणार नोंदणी
- ऑनलाईन पद्धतीने होणार परीक्षा
- उद्यापर्यंत नोंदणीची मुदत

करण्यात आले आहे. सकाळी ११ ते १२, दुपारी १ ते २, ३ ते ४ आणि सायंकाळी ५ ते ६ या वेळेत या परीक्षा घेण्यात येणार आहेत. या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर नोंदणी करावी. संबंधीत महाविद्यालयामध्ये जावून मोबाईल, ई मेल आयडी, परीक्षेचा विषय अशी सर्व माहिती भरुन नोंदणी करणे गरजेचे आहे. १ तासाची परीक्षा असून बहुपर्यायी विकल्प पद्धतीने परीक्षा घेण्यात येणार आहे.

## पुर्नपरीक्षार्थींची परीक्षा १५ डिसेंबर पासून

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी २०२० मधील सर्व अभ्यासक्रमांच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणार आहेत. १५ ते ३१ डिसेंबर दरम्यान या परीक्षा घेण्यात येणार आहेत. फेब्रुवारी २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा कोरोनामुळे स्थगित करण्यात आल्या होत्या. विधी विद्याशाखा, अभियांत्रिकी, फार्मसी या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वगळुन परीक्षा घेण्यात येणार आहेत. १ तासाची बहुपर्यायी प्रश्नावली असणारी प्रश्नपत्रिका असणार असून ऑनलाईन व ऑफलाइन पद्धतीने ही परीक्षा होणार आहे.

# ‘तंत्रज्ञानाला संवदेनशीलतेची जोड देणे आवश्यकच’

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आधुनिक तंत्रज्ञानाने सर्वत्र भौतिक प्रगती झाली आहे. त्यापाठोपाठ असंवेदशीलताही तितक्याच जोमाने वाढू लागली आहे. असे एकीकडे चित्र असले तरी सध्या जे काही तंत्रज्ञान विकसित होत आहे, त्याला संवदेनशीलतेची जोड असणे आवश्यक झाले आहे, असे प्रतिपादन काडसिद्धेश्वर स्वामी यांनी केले.



केआयटी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योगभूषण (कै.) शिवाजीराव देसाई यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये व्याख्यान झाले. ‘तंत्रज्ञान युगातील सामाजिक भान” असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. पांडुरंग शेवाळे होते. आपल्या विषयाची सविस्तर मांडणी करताना काडसिद्धेश्वर स्वामी यांनी पुरातन भारतीय तंत्रज्ञानाचा समाजासाठी केलेला सदुपयोगाची उदाहरणासह माहिती सांगितली. डॉ. शेवाळे यांचेही भाषण झाले. कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष भरत पाटील यांनी शिवाजीराव देसाई यांच्या कार्याची माहिती सांगितली. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. विलास कार्जिन्नी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिवाजीराव देसाई प्रतिष्ठानच्या अध्यक्ष शशीताई देसाई, टेक्नॉलॉजीचे उपाध्यक्ष सुनील कुलकर्णी व सचिव दीपक चौगुले आदी उपस्थित होते.

# अंतिम वर्षाच्या पुनर्परीक्षा १७ डिसेंबरपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्रातील पुनर्परीक्षा दि. १७ डिसेंबरपासून घेण्यात येणार आहेत. या परीक्षा ऑनलाईन व बहुपर्यायी पद्धतीने घेण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

परिपत्रकामध्ये म्हटले आहे की, उन्हाळी २०२० मधील अंतिम वर्ष अंतिम सत्र परीक्षेसाठी विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा २७ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत घेण्यात आली; मात्र या परीक्षा कालावधीमध्ये काही विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा, कोविड-१९ प्रादुर्भाव, गैरहजर अथवा तांत्रिक कारणामुळे परीक्षेस प्रविष्ट होता आलेले नाही. अशा विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्र अंतिम वर्ष परीक्षा घेण्यात येत आहेत. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. जे विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत, त्यांनी संबंधित महाविद्यालय आणि स्टडी सेंटर यांच्यामार्फत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या लिंकवर जाऊन परीक्षेबाबतची माहिती भरणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी आवश्यक माहिती भरतील, त्यांची परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

# शिवाजी विद्यापीठात पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेससाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागामध्ये पी. जी. डिप्लोमा इन ई - बिझनेस अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या कोर्सला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, गृहिणी प्रवेश घेऊ शकतात. अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठातील एमबीए अधिविभागाशी संपर्क साधावा अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

# रीपिटर विद्यार्थ्यांच्या परीक्षा १५ पासून

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम रीपिटर विद्यार्थ्यांच्या परीक्षा पंधरा ते ३१ डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. अभियांत्रिकी, फार्मसी, विधी अभ्यासक्रम वगळून या परीक्षा होणार असून सूचना अधिविभागांना दिल्या आहेत. वेळापत्रक विद्यापीठातील संबंधित विषयांचे अधिविभाग करणार असून ते महाविद्यालयांना पाठवले जाणार आहे.